**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

**विद्युत विभाग**

**विषय:- विकसीत भारत संकल्प् यांत्रेच्या अनुषंगाने करावयाच्या कामांकरिता निधि उपलब्धतेकामी लेखाशिर्ष मध्ये तरतुदी मध्ये खर्चाचे पुर्ननियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्तावना,**

महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या दिनांक 13/04/2023 च्या शासन निर्णयान्वये "शासन आपल्या दारी" कार्यक्रम दिनांक 18 जानेवारी 2024 ते 15 जानेवारी 2024 रोजी व प-लॅगशिप योजनांचे लाभ लक्ष्यित लाभार्थ्यापर्यंत वेळेत पोहोचावेत याची खात्री करण्याच्या उददेशाने "विकसीत भारत संकल्प् यात्रा" देशव्यापी मोहिम केंद्र शासनाकडून राबविण्यात येत असल्याने सदर कार्यक्रमासाठी तरतुदीचे पुर्ननियोजन करणे कामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

"विकसीत भारत संकल्प् यात्रा देशव्यापी मोहिम केंद्र शासनाकडून दिनांक 15 नोव्हेंबर 2023 ते दि.26 जानेवारी 2024 पर्यंत प्रभाग समिती क्रमांक 1 ते 5 अतंर्गत राबविण्यात येणार असून त्याकामी मंडप, टेबल, खुर्ची,कुशन खर्ची,स्टेज,स्टॅण्ड फॅन, साऊंड सिस्टिम, कापडी पार्टीशियन, कारपेट,जनरेटर, एल.ई.डी.प-लड लाईट, थ्री पिन,प्ल्ग स्विच इत्यादी बाबींची आवश्यकता असून त्याकामी प्रभाग निहाय अंदाजे एकूण 25 लाखांचा खर्च होणार आहे. महानगरपालिकेच्या सन 2023-24 च्या अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष् "गणपती, बतकम्मा, छटपुजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईदसाठी रोषणाई व इतर खर्च" या तरतुदी मधून गणपती व इतर सणा निमित्त वार्षिक कामी मंडप, टेबल, खुर्ची,कुशन खर्ची,स्टेज,स्टॅण्ड फॅन, साऊंड सिस्टिम, कापडी पार्टीशियन, कारपेट,जनरेटर इत्यादी भाडयाने पुरविण्याची कामे करण्यात येतात. विभागा मार्फत अर्थसंकल्पातील "गणपती, बतकम्मा, छटपुजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईदसाठी रोषणाई व इतर खर्च" या "महसुली खर्चात" रुपये 65 लाख निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सन 2023-24 मध्ये आतापर्यंत मंजुर तरतुदी नुसार विविध सण, उत्सवा करिता 62 लाख निधि खर्च झालेला आहे. तरी वरिल विषयांकित कामाकरिता निधी शिल्लक नाही.

विकसित भारत संकल्प् यात्रा याकामी करावयांच्या कामांकरिता सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील विद्युत विभागा कडिल लेखाशिर्ष तरतुदीं मध्ये असलेल्या शिल्लक रक्कमेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 101 (1) नुसार खालीलप्रमाणे पुर्ननियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त यांच्या कडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त् यांनी दिनांक /01/2023 रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नुसार नमुना नं. 10 (Form No. 10) नियिक 30(3) तरतुदीच्या अधिन राहुन पुर्ननियोजन करिता प्रस्तावना सादर करण्यात येत आहे.

| **या शिर्षातून** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अनुक्रमांक** | **प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष्** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मुळ अनुदान** | **आज तारखे पर्यंत खर्च** | **उपलब्ध शिल्लक** | **शेरा** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्मशानभूमी/कब्रस्तान स्ट्रिट लाईट व्यवस्था करणे | | 20 लाख | 15 लाख | 5 लाख | |
| 2 | कै.परशुराम टावरे क्रिडा संकुल येथे इलेक्ट्रिफिकेशन | | 10 लाख | 0 | 10 लाख | |
| 3 | जनरेटर खरेदी | | 5 लाख | 0 | 5 लाख | |
| 4 | वातानुकूलित यंत्रणा खरेदी | | 10 लाख | 5 लाख | 5 लाख | |
| | **एकूण** | | | | **25 लाख** | |

| **हया शिर्षात** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष्** | **बांधकाम विषयक सेवा वगैरे** | **मुळ अनुदान** | **आज तारखे पर्यंत खर्च** | **प्रस्तावित वाढीची रक्कम** | **शेरा** |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| गणपती, बतकम्मा, छटपुजाएमहावीजण् डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च | - | 65 लाख | 62 लाख | 25 लाख | 25 लाख पुर्ननियोजन केल्यानंतर एकुण तरतुद 90 लाख शिल्लक तरतुद 28 लाख |

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांचे असल्याने त्याअनुषंगाने सन 2023-2024 मंजुर अंर्थसकल्पातील विद्युत विभागाकरिता असलेल्या "विकसीत भारत संकल्प् यात्रे" च्या अनुषंगाने करावयाच्या कामां करिता निधी उपलब्धतेकामी खर्चाचे पुर्ननियोजन करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

(सुरेश भट्ट)
**शहर अभियंता**
o/c **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

## विद्युत विभाग

**विषय:- विकसीत भारत संकल्प् यांत्रेच्या अनुषंगाने करावयाच्या कामांकरिता निधि उपलब्धतेकामी लेखाशिर्ष मध्ये तरतुदी मध्ये खर्चाचे पुनर्नियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

**प्रस्तावना,**

महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या दिनांक 13/04/2023 च्या शासन निर्णयान्वये "शासन आपल्या दारी " कार्यक्रम दिनांक 18 जानेवारी 2024 ते 15 जानेवारी 2024 रोजी व प-लॅगशिप योजनांचे लाभ लक्षियत लाभार्थ्यापर्यंत वेळेत पोहोचावेत याची खात्री करण्याच्या उददेशाने "विकसीत भारत संकल्प् यात्रा" देशव्यापी मोहिम केंद्र शासनाकडून राबविण्यात येत असल्याने सदर कार्यक्रमासाठी तरतुदीचे पुनर्नियोजन करणे कामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

"विकसीत भारत संकल्प् यात्रा देशव्यापी मोहिम केंद्र शासनाकडून दिनांक 15 नोव्हेंबर 2023 ते दि.26 जानेवारी 2024 पर्यंत प्रभाग समिती क्रमांक 1 ते 5 अतंर्गत राबविण्यात येणार असून त्याकामी मंडप, टेबल, खुर्ची,कुशन खर्ची,स्टेज,स्टॅण्ड फॅन, साऊंड सिस्टिम, कापडी पार्टीशियन, कारपेट,जनरेटर, एल.ई.डी.प-लड लाईट, थ्री पिन,प्लग स्विच इत्यादी बाबींची आवश्यकता असून त्याकामी प्रभाग निहाय अंदाजे एकूण 25 लाखांचा खर्च होणार आहे. महानगरपालिकेच्या सन 2023-24 च्या अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष् "गणपती, बतकम्मा, छटपुजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईदसाठी रोषणाई व इतर खर्च" या तरतुदी मधून गणपती व इतर सणा निमित्त वार्षिक कामी मंडप, टेबल, खुर्ची,कुशन खर्ची,स्टेज,स्टॅण्ड फॅन, साऊंड सिस्टिम, कापडी पार्टीशियन, कारपेट,जनरेटर इत्यादी भाडयाने पुरविण्याची कामे करण्यात येतात. विभागा मार्फत अर्थसंकल्पातील "गणपती, बतकम्मा, छटपुजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईदसाठी रोषणाई व इतर खर्च" या "महसुली खर्चात" रुपये 65 लाख निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सन 2023-24 मध्ये आतापर्यंत मंजुर तरतुदी नुसार विविध सण, उत्सवा करिता 62 लाख निधि खर्च झालेला आहे. तरी वरिल विषयांकित कामाकरिता निधी शिल्लक नाही.

विकसित भारत संकल्प् यात्रा याकामी करावयांच्या कामांकरिता सन 2023-24 च्या अर्थसंकल्पातील विद्युत विभागा कडिल लेखाशिर्ष तरतुदीं मध्ये असलेल्या शिल्लक रक्कमेची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 101 (1) नुसार खालीलप्रमाणे पुनर्नियोजन करणेकामी मा.प्रशासक तथा आयुक्त यांच्या कडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त् यांनी दिनांक /01/2023 रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 नुसार नमुना नं. 10 (Form No. 10) नियिक 30(3) तरतुदीच्या अधिन राहुन पुनर्नियोजन करिता प्रस्तावना सादर करण्यात येत आहे.

**या शिर्षातून**

| अनुक्रमांक | प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्मशानभूमी/कब्रस्तान स्ट्रिट लाईट व्यवस्था करणे | | 20 लाख | 15 लाख | 5 लाख | |
| 2 | कै.परशुराम टावरे क्रिडा संकुल येथे इलेक्ट्रिफिकेशन | | 10 लाख | 0 | 10 लाख | |
| 3 | जनरेटर खरेदी | | 5 लाख | 0 | 5 लाख | |
| 4 | वातानुकूलित यंत्रणा खरेदी | | 10 लाख | 5 लाख | 5 लाख | |
| | **एकूण** | | | | **25 लाख** | |

**हया शिर्षात**

| प्रधान,गौण् व तपशीलवार शीर्ष् | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| गणपती, बतकम्मा, छटपुजाएमहावीजण् डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च | - | 65 लाख | 62 लाख | 25 लाख | 25 लाख पुर्ननियोजन केल्यानंतर एकुण तरतुद 90 लाख<br>शिल्लक तरतुद 28 लाख |

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 (अ) नुसार मा.प्रशासक म्हणुन अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त् सो. यांचे असल्याने त्याअनुषंगाने सन 2023-2024 मंजुर अंर्थसकल्पातील विद्युत विभागाकरिता असलेल्या "विकसीत भारत संकल्प् यात्रे" च्या अनुषंगाने करावयाच्या कामां करिता निधी उपलब्धतेकामी खर्चाचे पुर्ननियोजन करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव** 32६

**दिनांक** १८/०१/२०२४

**विषय:- विकसीत भारत संकल्प् यांत्रेच्या अनुषंगाने करावयाच्या कामांकरिता निधि उपलब्धतेकामी लेखाशिर्ष मध्ये तरतुदी मध्ये खर्चाचे पुर्ननियोजन करणेबाबतचा प्रस्ताव.**

"विकसीत भारत संकल्प् यात्रे" च्या अनुषंगाने करावयाच्या कामां करिता निधी उपलब्धतेकामी तरतुदींचे पुर्ननियोजन करणेकामी प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, मुख्या लेखा परिक्षक, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, अतिरीक्त् आयुक्त् यांनी केलेल्या शिफारशीसी नुसार नगरविकास विभागाकडिल शासन निर्णय क्रमांक एम.सी.ओ. -2020/प्र.क्र.71(भाग-2)नवी 14 दिनांक 6 जून 2022 अन्वये

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विषेशत: कलम 452 अ च्या (1 अ ) व (1 ब ) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार श्री.अजय वैद्य प्रशासक विद्युत विभागाकडिल गणपती उत्सव, बतकम्मा, छटपूजा, महावीर जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिवजंयती व ईद साठी रोषणाई व इतर खर्च या लेखाशिर्षात रुपये 25 लाख तरतुदींचे पुनर्नियोजन करण्यास मान्य्ता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त्**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :- प्र.स.क्र.5 च्या कार्यक्षेत्र:तील बी.जी.पि.हॉस्पिटल या ठिकाणी बांधण्यात आलेल्या अर्बन कम्यूनिटी हेल्थ सेंटर करीता कार्यालयीन फर्नीचर पुरवीने.**

प्र.स.क्र.5 च्या कार्यक्षेत्र:तील बी.जी.पि.हॉस्पिटल या ठिकाणी बांधण्यात आलेल्या अर्बन कम्यूनिटी हेल्थ सेंटर करीता कार्यालयीन फर्नीचर पुरवीने. कामी रक्कम रु. **५०,७६,९२६**/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रशासकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. 326 दिनांक :- १६ /०७ /२०२४

प्र.स.क्र.5 च्या कार्यक्षेत्र:तील बी.जी.पि.हॉस्पिटल या ठिकाणी बांधण्यात आलेल्या अर्बन कम्यूनिटी हेल्थ सेंटर करीता कार्यालयीन फर्नीचर पुरवीने. रु. **५०,७६,९२६**/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी **अजय वैद्य**, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी. प्र.स.क्र.5 च्या कार्यक्षेत्र:तील बी.जी.पि.हॉस्पिटल या ठिकाणी बांधण्यात आलेल्या अर्बन कम्यूनिटी हेल्थ सेंटर करीता कार्यालयीन फर्नीचर पुरवीने. रु. **५०,७६,९२६**/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय ठरावाची मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

**विषय :-** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायम स्वरूपी/सेवानिवृत्त असलेले वैद्यकिय अधिकारी यांना सुधारीत वेतनश्रेणी ८०००-१३५०० लागु करणे व त्यानुसार सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**प्रस्तावना,**

मनपाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व सेवानिवृत्त अधिकारी यांना ५व्या वेतन आयोगानुसार ६५००-१०५०० अशी वेतनश्रेणी लागू करण्यात आली होती. मात्र वैद्यकिय अधिकारी भिनिशमनपा यांनी सन २००८ तसेच दि.०७/०७/२०२३ व दि.१९/१०/२०२३ रोजी शासन निर्णय क्र. वेपुर-१२०१/प्र.क्र.४/सेवा-९ दि.२७/०२/२००६ रोजी सदरची वेतनश्रेणी सुधारीत करण्यात येऊन त्यामध्ये २२००-४००० या वेतनश्रेणीस ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी न घेता ८०००-१३५०० अशी वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

त्यानुसार शासन निर्णय क्र. वेपुर -१२०१/प्र.क्र./सेवा-९ दि.२७/०२/२००६ नुसार लागु केलेली आहे. सदरची वेतनश्रेणी दि. 01/01/1996 पासून लागू करावयाची असून वेतन निश्चितीचा लाभ दि.01/04/2006 पासून अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच दि.01/01/1996 पासून ते दि.31/03/2006 पर्यंतच्या वेतननिश्चिती संबंधीच्या फरकाची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

त्यानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी व सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांना सदरची वेतनश्रेणी सुधारीत करण्यात येऊन त्यामध्ये 2200-4000 या वेतनश्रेणीस 6500-10500 ही चेतनश्रेणी न घेता 8000-13500 अशी वेतनश्रेणी मंजूर करणेकामी शासनाची धारणा पक्की करणेकामी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी यांना 5व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेकामीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मान्यतेकरीता सादर केला असता सदर प्रस्तावास मा.महासभेने मा. महासभा ठराव क्र.183, दि.13/08/2010 नुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी यांना 5व्या वेतन आयोगानुसार शासनाच्या मान्यतेने दि.01/04/2006 पासून रु.8000-13500 ही वेतनश्रेणी लागू करणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 51 (4) अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे. असा ठराव केला आहे.

तसेच महानगरपालिकेचा आस्थापना खर्चाची टक्केवारी ही 47.41 टक्के इतका आहे. सदर वैद्यकीय अधिकारी व सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांना 5 व्या वेतन आयोगानुसार 8000-13500 अशी वेतनश्रेणी मंजूर केल्यास 6 व्या व 7 व्या वेतन आयोगानुसार फरकापोटी अंदाजे रक्कम रु. 2 कोटी इतकी रक्कम अदा करावी लागेल व मनपा आस्थापनेवरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांचे पगारात दरमहा अंदाजे रक्कम रु.1,53,600/- इतकी वाढ होईल.

सबब, उपरोक्त शासन निर्णयानुसार भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत व सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी यांना रु. 8000-13500 अशी वेतनश्रेणी दि.01/04/2006 पासून देणेकामी

हरकत नाही, अशी या कार्यालयाची धारणा आहे. तरी सदर धारणा पक्की करणेबाबत व मार्गदर्शन करणेबाबत योग्यते आदेश निर्गमित करण्यासाठी शासनास पत्र पाठविण्यात आले आहे.

तरी, उपरोक्त संबधीत शासन निर्णय व परिपत्रकांमधील मागदर्शक सुचना व त्यासंबधीत निर्गमित अद्यायावत शासन निर्णय व परिपत्रकांतील भिवंडी मनपाचे कायम स्वरूपी/सेवानिवृत्त वैद्यकिय अधिकारी यांनी सुधारीत वेतनश्रेणी लागु करणेकामीतसेच त्याकामी होणारे आस्थापना खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ (१) नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** 328 **दिनांक** १८ / ०७ /२०२३

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकिय अधिकारी हे अत्यावश्यक सेवा असल्याने यांना ५ व्या वेतन आयोगानुसार शासनाच्या मान्यतेने ०१/०४/२००६ पासुन रु.८०००-१३५०० ही वेतनश्रेणी लागु करणेकामी व त्यानुसार सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करणेकामी मंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) अन्वये शासनाकडे प्रस्ताव सादर करणेकामी **महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र.एमसीओ २०२०/प्रक्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१) तूरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सदर प्रस्तावास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मंजूर करण्यात येत आहे.**

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

दि:-११/१/२०२४

**विषय:-** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (भिवंडी नि. शहर महानगरपालिका) अंतर्गत मंजूर बीजीपी (बाई गोलबाई पेटीट) येथील अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर करीता करार तत्वावर / ठोक मानधनावर मनुष्यबळ भरतीबाबत.

**प्रस्तावना**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेतील राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (भिवंडी नि. शहर महानगरपालिका) अंतर्गत मंजूर बीजीपी (बाई गोलबाई पेटीट) येथील अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर करीता करार तत्वावर / ठोक मानधनावर मनुष्यबळ उपलब्ध करून देणेकामी आरोग्य विभागामार्फत अहवाल सादर करण्यात आला असून, सदर अहवालास मा.आयुक्त सो., यांनी मान्यता दिलेली आहे. सदर कामी सन २०२३-२४ मधील अर्थसंकल्पात ठोक वेतनावरील कर्मचारी/अधिकारी या लेखाशिर्षात पुरेसी तरतुद उपलब्ध नसल्याने सादर केलेल्या अहवालामध्ये मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी नमूद केल्यानुसार नगरसेवक निधी या लेखाशिर्षातून पुर्नविनियोजन करण्यास मा. आयुक्त तो, यांनी मान्यता दिलेली आहे.

त्याअनुषंगाने नगरसेवक निधी मध्ये रक्कम रू. ९७०.८८लाख एवढी तरतुद असून आज तारखेपर्यंत कोणत्याही खर्चाची तरतुद झालेली नाही. सदर लेखाशिर्षातुन रक्कम रू.१,६४,५८०००/- पुर्नविनियोजन करून सदरची रक्कम ठोक वेतनावरील कर्मचारी व अधिकारी या लेखाशिर्षात घेणेकामी नमुना क्र. १०, नियम ३० (३) मध्ये मान्यता देण्यात आलेली आहे

उक्त प्रमाणे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (भिवंडी नि. शहर महानगरपालिका) अंतर्गत मंजूर बीजीपी (बाई गोलबाई पेटीट) येथील अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर करीता करार तत्वावर / ठोक मानधनावर मनुष्यबळ उपलब्ध करून देणेकामी रु. १,६४,५८,०००/- खर्च होणे अपेक्षित असून सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-१) नवी-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२अ (१) तरतुदीनुसार. **मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांना प्राप्त अधिकारानुसार नगरसेवक निधी अंतर्गत असलेली रक्कम रु.१,६४,,५८०००/- ठोक** वेतनावरील अधिकारी व कर्मचारी या लेखाशीर्षकअंतर्गत समायोजित करण्यास मान्यता मिळणे कामी सादर

**प्रशासकीय ठराव क्रमांक** 32e **दिनांक** 9(/07 /२०२४

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (भिवंडी नि. शहर महानगरपालिका) अंतर्गत मंजूर बीजीपी (बाई गोलबाई पेटीट) येथील अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर करीता करार तत्वावर / ठोक मानधनावर ६६ उमेदवारांची आवश्यकता आहे.

तरी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (भिवंडी नि. शहर महानगरपालिका) अंतर्गत मंजूर बीजीपी (बाई गोलबाई पेटीट) येथील अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर करीता करार तत्वावर / ठोक मानधनावर मनुष्यबळ पदसंख्या-६६ करीता ०६ महिन्याचा एकूण खर्च रु. १,६४,,५८,००००/-होणे अपेक्षित असून ठोक वेतनावर अधिकारी कर्मचारी या लेखाशीर्षकांतर्गत पुरेशी रक्कम उपलब्ध नसल्याने सदर लेखाशीर्षक अंतर्गत नगरसेवक निधी समायोजित करणे कामी सद्यस्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-१) नवी-१४, दि.०६/०६/२०२२ अन्वये **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२अ (१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.**

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**प्रस्तावना :- घनकचरा व्यवस्थापना कामी प्रभाग समिती निहाय आवश्यक वाहने भाडेतत्वावर घेणे कामी सहा महिन्याच्या खर्चास व याकामी होणा-या खर्चास पुर्नविनियोजन करणे मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

मे.सविनय़ सादर,

घनकचरा व्यवस्थापन ठेकेदार मे.आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. बोरिवली, मुंबई या ठेकेदार संस्थेचे घनकचरा व्यवस्थापन कामाचे माहे सप्टेंबर २०२३ चे रु.१,८५,५५,६३९/- इतके देयक प्रस्तावित करण्यात आले असुन माहे ऑक्टोबर २०२३, माहे नोव्हेंबर २०२३ व माहे डिसेंबर २०२३ चे देयक अदा करणेचे बाकी असुन ठेकेदारा मार्फत दरमहा अंदाजे १.५० कोटी ते २ कोटी पर्यंत मासिक देयक सादर केले जातात.उक्त ठेकेदार यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने आरोग्य विभागा मार्फत जा.क्र.भिनिशमनपा/आरोग्य/१६०४, दि.११/१२/२०२३ रोजी ६० दिवसांची अंतीम नोटीस बजावण्यात आली आहे.

अंतिम नोटीस बजावल्या नंतर ही ठेकेदाराच्या कामात सुधारणा आढळुन येत नसल्याने संबंधित ठेकेदार यांनी याबाबत अद्याप कोणतेही लेखी निवेदन मनपाकडे सादर केलेले नाही.त्यामुळे घनकचरा संकलन व वहन करणेचे काम अधिक चांगल्या पद्धतीने करणे बाबत ठेकेदार यांची मानसिकता आढळुन येत नाही.माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणुक आचारसहिता लागण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तसेच ठेकेदार यांनी कामात सुधारणा न केल्यास सदर कालावधीत नविन निविदा प्रसिद्ध होऊ शकत नाही,तसेच निविदा अंतिम न झाल्यास कामात व्यत्यय निर्माण स्थानिक नागरिकांचे आरोग्याचा प्रश्न निर्माण होवुन ठेका रद्द झाल्यास घनकचरा व्यवस्थापना कामी पर्यायी व्यवस्थापनेचे नियोजन करणेचे निर्देश मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.२२/११/२०२३ रोजी दिले असल्याने खालील प्रमाणे पर्यायी व्यवस्थापनाचे नियोजन व खर्चाचा तपशील सादर करण्यात येत आहे.

त्यामुळे मनपा मालकीच्या घंटागाडी व आर.सी.गाडी यांचा वापर करुन मनपाच्या वाहन विभागाकडील मंजुर दरानुसार, मंजुर ठेकेदाराकडुन ड्रायव्हर उपलब्ध करुन मनपा मार्फत इंधन पुरवठा करुन कचरा संकलनाचे काम करणेचे नियोजन असुन उक्त वाहनांवरती मनपाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले सफाई कर्मचारी नेमुन त्याद्वारे कार्यवाही पार पाडता येईल.त्यादृष्टीने मनपाची वाहने तसेच अतिरिक्त वाहने आवश्यतेनुसार मासिक भाड्याने घेवुन त्याआधारे काम पुर्ण करणे गरजेचे आहे.मनपाकडील वाहंनाचा खर्चाचा तपशील व भाडेतत्वावर घेण्यात येणा-या वाहना करिता खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| ➢ **मनपाची उपलब्ध असणारी साधन सामग्री लागणारा खर्च** | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | कामाचा तपशील | प्रति दिन खर्च | मासिक खर्च |
| १ | वाहनचालक खर्च | --- | रु.२३,९०,६००/- |
| २ | मजुरांचा खर्च | मनपाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले सफाई कर्मचारी नियुक्त | |
| ३ | घंटागाडी डिझेल खर्च | रु.२२,१६४ | रु.६,६४,९२०/- |
| ४ | आर.सी.गाडीवर डिझेल खर्च | रु.३४,९०८.३/- | रु.१०,४७,२४९/- |
| | जेसीबी | रु.१४,७७६/- | रु.४,४३,२८०/- |
| | | एकुण | रु.४५,४६,०४९/- |

| ➢ **भाडेतत्वावर घेण्यात येणा-या वाहनाकरिता लागणारा खर्च** | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र | कामाचा तपशील | प्रति दिन खर्च | मासिक खर्च |
| १ | ट्रॅक्टर (२ युनिट) | रु.६३६८/- | रु.१,९१,०४०/- |
| २ | घंटागाडी (४५ युनिट) | रु.१,१०,२५०/- | रु.३३,०७,५००/- |
| ३ | डंपर (२० युनिट) | रु.५५,०००/- | रु.१६,५०,०००/- |
| ४ | जेसीबी (१० युनिट) | रु.१,०१,७६०/- | रु.३०,५२,८००/- |
| ५ | मनपा कार्यक्षेत्र व जीएसटी | रु.६५,३३७/- | रु.१९,६०,११०/- |
| | एकुण (Corporation Areas) व GST मिळुन | रु.३,३८,७१५/- | रु.१,०१,६१,४६०/- |

वरिल तपशीला प्रमाणे मनपाच्या उपलब्ध वाहनांवर वाहनचालक, इंधन खर्च व भाडेतत्वावरील वाहनांवर दरमहा रु.१,४७,०७,५०९/- इतका येत खर्च आहे.

सन २०२३-२०२४ या अर्थिक वर्षात अंदाजपत्रकात घनकचरा व्यवस्थापन या लेखा शिर्षका खाली रु.१९ कोटी मात्रची तरतुद आहे.सदर तरतुद निधी संपुष्टात आली असल्याने सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका खाली रु.१० कोटी तरतुद मंजुर करण्यात आली असुन उक्त तरतुद निधी मधुन रु.३४,९३,२५०/- इतका निधी खर्च होवुन रु.९,६५,०६,७५०/- इतका निधी शिल्लक असल्याने उक्त तरतदु निधी मधुन घनकचरा संकलन व वहन यासाठी मनपाच्या उपलब्ध वाहनांवर वाहनचालक, इंधन खर्च व भाडेतत्वावरील वाहनांवर दरमहा येणारा खर्चास रु.१,४७,०७,५०९/- इतका असल्याने उक्त खर्चास सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी पुर्नविनियोजनास तसेच पुढील खर्च सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापना कामी मंजुर असलेल्या तरतुद निधी मधुन उर्वरित खर्च करणेचे असल्याने एकुण ६ महिन्याच्या कालावधी करणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी.

**प्रशासकिय ठराव क्र.** 330 **दि.**१९/ ०१ **/२०२४**

घनकचरा व्यवस्थापना कामी मे.आर.ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.बोरिवली, मुंबई यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने मनपाकडुन दिलेल्या अंतीम नोटीसचा कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा सादर न केल्याने संबंधितांस बजावण्यात आलेल्या नोटीस मधील नमुद कालावधी संपुष्टात आले नंतर मे.आर. ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.बोरिवली, मुंबई यांचे सोबत झालेला करारनामा रद्द करुन अत्यंत तातडीचे व निकडीची बाब म्हणुन मनपाची मालकीची वाहने उक्त वाहनांवर वाहनविभागाकडील मंजुर निविदे प्रमाणे वाहनचालक घेणे तसेच अतिरिक्त असलेले आवश्यक संख्ये मध्ये वाहने भाडेतत्वावर घेणेसाठी अंदाजे दरमहा रु.१,४७,०७,५०९/- इतक्या खर्च येत असल्याने दरमहा येणा-या ६ महिन्याच्या कालावधी करिता होणा-या खर्चास व उक्त कामा करिता रु.३ कोटी खर्चास पुर्नविनियोजन करणे त्याच प्रमाणे प्रभाग समिती निहाय निविदा मागविणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे कामी शिफारस केली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग२)/ नवि, दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी,अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापना कामी मे.आर.ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि.बोरिवली,मुंबई यांचे दैनंदिन कामात अकार्यक्षमता व हलगर्जीपणा करीत असल्याने व मनपा कडुन दिलेल्या अंतीम नोटीसचा कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा सादर न केल्याने संबंधितांस बजावण्यात आलेल्या नोटीस मधील नमुद कालावधी संपुष्टात आले नंतर **मे.आर. ॲण्ड.बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.बोरिवली, मुंबई यांचे सोबत झालेला करारनामा रद्द करुन** अत्यंत तातडीचे व निकडीची बाब म्हणुन मनपा तर्फे पुरविण्यात आलेल्या मनपाची मालकीची वाहने उक्त वाहनांवर वाहन विभागाकडील मंजुर निविदे प्रमाणे आवश्यक संख्ये मध्ये वाहनचालक घेणे तसेच अतिरिक्त असलेले आवश्यक संख्ये मध्ये वाहने भाडेतत्वावर घेणेसाठी अंदाजे दरमहा रु.१,४७,०७,५०९/- इतक्या खर्च येत असल्याने दरमहा येणा-या ६ महिन्याच्या कालावधी करिता होणा-या खर्चास व उक्त कामा करिता सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात निवडणुक खर्च या लेखा शिर्षका मधील रु.१० कोटी मधुन रु.३ कोटी खर्च पुर्नविनियोजनास तसेच पुढील खर्च सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील घनकचरा व्यवस्थापना कामी मंजुर असलेल्या तरतुद निधी मधुन उर्वरित खर्च करणे त्याच प्रमाणे अतिरिक्त असलेले आवश्यक संख्ये मध्ये वाहने भाडेतत्वावर घेणेसाठी प्रभाग समिती निहाय निविदा मागविणेसाठी मंजुरी देण्यात येत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**